॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


*** सुविचार ***

लोकांचे तुमच्याबद्दल काय मत आहे
यापेक्षा तुमचे स्वत:बद्दल
काय मत आहे हे महत्त्वाचे.


आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट

'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर

आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.

आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप

आता बातमीबरोबरच बरेच काही

मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi



■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. ५ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक २४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### २५ राज्यांत वादळासह मुसळधार पावसाचा इशारा

● **मुंबई** – हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, आज उत्तर प्रदेश आणि बिहारसह २५ राज्यांमध्ये वादळासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल, बिहार आणि छत्तीसगडमधील अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडेल. अनेक राज्यांमध्ये ताशी ६० ते ७० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. बिहार, पूर्व राजस्थान आणि पूर्व मध्य प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये गारपीट होण्याची शक्यता आहे. येथे, ओडिशामध्येही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. काल, भोपाळ, इटारसी, छिंदवाडा, सिवनीसह मध्य प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळासह मुसळधार पाऊस पडला. मध्यप्रदेश-राजस्थानमधील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसानंतर तापमानात १० अंशांनी घट झाली आहे. त्याच वेळी, शुक्रवारी दिल्लीत झालेल्या विध्वंसानंतर, शनिवारीही वादळासह मुसळधार पाऊस पडला.

### काँग्रेसकडून इतिहासात झालेल्या चुकाची जबाबदारी मी घेतोय : राहुल गांधी

● **नवी दिल्ली** – मी नव्हतो, त्यावेळी पक्षाच्या अनेक चुका झाल्या. काँग्रेस पक्षाच्या इतिहासात झालेल्या प्रत्येक चुकीची जबाबदारी घेण्यास मी आहे. मी जाहीरपणे म्हटले आहे की, ८० च्या दशकात जे घडले, ते चुकीचे होते. मी अनेकवेळा सुवर्ण मंदिराला भेट दिली आहे. भारतातील शीख समुदायाशी माझे खूप चांगले संबंध असल्याचे मत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी व्यक्त केले आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा एक व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हीडीओमध्ये राहुल गांधी अमेरिकेतील ब्राउन विद्यापीठातील एका कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिसत आहेत. या कार्यक्रमादरम्यान एका शीख विद्यार्थ्याने राहुल गांधींना १९८४ च्या दंगली आणि शीख मुद्यांवर काही प्रश्न विचारले. त्या विद्यार्थ्याने राहुल गांधींना विचारले की तुम्ही म्हणालात की, राजकारण निर्भय असले पाहिजे, घाबरण्यासारखे काहीही नसावे. पण, आम्हाला फक्त कढा घालायचा नाही, आम्हाला फक्त पगडी बांधायची नाही, आम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवे आहे, जे काँग्रेस पक्षाच्या राजवटीत नव्हते. त्या दंगलीतील आरोपी सज्जन कुमार सारख्या लोकांना संरक्षण देत असलेल्या शीख आवाजांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही या विद्यार्थ्याने काँग्रेसवर केला.

# बगलिहार धरणाचे पाणी रोखले

## चिनाब नदीवरील धरणाचे पाणी अडवून भारताचा पाकला मोठा धक्का



● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानेपाकिस्तानविरोधात अनेक महत्वाची पाऊले उचलली आहेत. पाकिस्तानसोबतचा ६५ वर्षे जुना सिंधू करार रद्द करणे, हा पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने उचललेले हे सर्वांत मोठे पाऊल मानले जात आहे. दरम्यान, आता भारताने पाकविरोधात आणखी एक मोठे पाऊल उचलले आहे. भारत सरकारने चिनाब नदीवरील बगलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारा पाण्याचा प्रवाह थांबवला आहे. झेलम नदीवरील किशनगंगा धरणाचेही पाणी थांबवण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो.

मीडिया रिपोर्सनुसार, भारत जम्मूतील रामबन येथील बगलिहार जलविद्युत धरण आणि उत्तर काश्मीरमधील किशनगंगा जलविद्युत धरणाद्वारे आपल्या बाजूने पाकिस्तानकडे जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचे नियमन करू शकतो. याचा अर्थ असा की, या धरणांद्वारे पाकिस्तानला जाणारे पाणी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय थांबवता येते किंवा प्रवाह वाढवता येतो. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने दशकांपूर्वीचा हा करार स्थगित केला आहे.

१९६० मध्ये जागतिक बँकेच्या मध्यस्थीने भारत आणि पाकिस्तानमध्ये सिंधू पाणी करार झाला. याअंतर्गत, सिंधू नदी आणि तिच्या उपनद्यांचे पाणी दोन्ही देशांमध्ये विभागण्याचा निर्णय घेण्यात आला. बागलिहार धरण हा देखील दोन्ही शेजारी देशांमधील दीर्घकाळापासूनचा वादाचा विषय आहे. पाकिस्तानने यापूर्वी या प्रकरणात जागतिक बँकेकडून मध्यस्थीची मागणी केली आहे. त्याचप्रमाणे, किशनगंगा धरणाचाही वाद आहे.

### सिंधू करार

■ करारानुसार, पाकिस्तानला सिंधू प्रणालीच्या पश्चिमेकडील नद्यांवर (सिंधू, चिनाब आणि झेलम) नियंत्रण देण्यात आले आहे. पाकिस्तान सिंधू नदी प्रणालीतील सुमारे ९३% पाणी सिंचन आणि वीज निर्मितीसाठी वापरतो. पाकिस्तानची सुमारे ८०% शेती जमीन याच पाण्यावर अवलंबून आहे. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका महत्त्वाची आहे. हेच कारण आहे की, करार पुढे रद्द केल्यामुळे पाकिस्तान सतत युद्धाच्या धमक्या देत आहे.

# नगर-पुणे रोडवर एसटी बस जळून खाक



● **नगर । वीरभूमी–**

नगर-पुणे रोडवर एसटी बसला भीषण आग लागल्याची घटना घडली असून ही बस पुण्याकडे जात होती. यावेळी एसटी बसला भीषण आग लागून बस संपूर्ण जळून खाक झाली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग कशामुळे लागली याचे कारण मात्र अस्पष्ट असल्याची माहिती मिळत आहे.

चालकाने प्रसंगावधान राखत एसटी रोडच्या कडेला घेतल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. एसटी बस जळत असल्यामुळे नगर-पुणे महामार्गावरील वाहतूक काही वेळ खोळंबली होती. सध्या या रस्त्यावर धीम्या गतीने वाहतूक सुरु असल्याचे दिसत आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून एसटी बसला आग लागण्याचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

एका बाजुला उन्हाचा पारा चांगलाच वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. दुसऱ्या बाजूला अनेक ठिकाणी रस्त्यांचे देखील प्रश्न आहेत. त्यामुळे काही ठिकाणी एसटीचे अपघात देखील होतात.

# आज बारावीचा निकाल

● **मुंबई । वीरभूमी–**

राज्यातील बारावीचा निकाल उद्या म्हणजे ५ मे २०२५ रोजी जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ५ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. याबाबत राज्य शिक्षण मंडळाने माहिती दिली आहे. तर मंगळवारपासून (६ मे) महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिका दिली जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र निकालासाठी अधिसूचना जारी केली आहे. अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र बोर्ड बारावीचा निकाल उद्या दुपारी जाहीर केला जाईल. बोर्डाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यानंतर, विद्यार्थी अधिकृत वेबसाईट mahresult.nic.in वर जाऊन गुणपत्रिकेची प्रत डाऊनलोड करून निकाल पाहू शकतील. दरम्यान, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी-मार्च २०२५ दरम्यान दहावी आणि बारावीची परीक्षा घेण्यात आली.

### या संकेतस्थळांवर पाहा निकाल

■ results.digilocker.gov.in

■ https://mahahsscboard.in

■ http://hscresult.mkcl.org

■ https://results.targetpublications.org

■ https://results.navneet.com

# थरारक सामन्यात राजस्थानचा १ धावाने पराभव

● **कोलकाता । वीरभूमी–**

ईडन गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने राजस्थान रॉयल्सचा एका धावेने पराभव केला. केकेआरने ११ सामन्यांत पाचवा विजय मिळवला तर राजस्थानला १२ सामन्यांत नववा पराभव पत्करावा लागला. कर्णधार रियान परागने राजस्थानला विजय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, पण तो ९५ धावा करून आऊट झाला. शेवटच्या षटकात राजस्थान रॉयल्सला विजयासाठी २२ धावांची आवश्यकता होती. एका रोमांचक सामन्याच्या शेवटच्या षटकात केकेआरचा वेगवान गोलंदाज वैभव अरोराने संघाला सनसनाटी विजय मिळवून दिला.

जेव्हा केकेआर फलंदाजीसाठी आला, तेव्हा त्यांची सुरुवात खूपच खराब झाली. सुनील नारायण काही खास कामगिरी करू शकला नाही आणि ९ चेंडूत ११ धावा काढून आऊट झाला. पण, यानंतर रहमानउल्लाह गुरबाज आणि रहाणे यांनी संघाची धुरा हातात घेतली आणि जलद धावा केल्या आणि संघाचा धावसंख्या ५० च्या पुढे नेला. गुरबाजने २५ चेंडूत ४ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ३५ धावा केल्या. ११३ धावांवर रहाणे (३०) च्या रूपात संघाने तिसरी विकेट गमावली.



रहाणे गेल्यानंतर असे वाटत होते की केकेआर १७०-१८० धावांचा डोंगर उभारू शकणार नाही. पण अंगकृष रघुवंशी आणि आंद्रे रसेल यांनी शेवटच्या षटकांमध्ये आरआरच्या गोलंदाजांना झोडपून काढले आणि चौथ्या विकेटसाठी ५९ धावांची भागीदारी केली. रघुवंशीने ४४ धावा केल्या. त्याच वेळी, रसेलने या हंगामात पहिल्यांदाच आपला जबरदस्त फॉर्म दाखवला आणि २५ चेंडूत ५७ धावांची शानदार खेळी खेळली. यामध्ये ४ षटकार आणि ६ गगनचुंबी षटकार मारले. अशाप्रकारे, संपूर्ण षटक खेळल्यानंतर केकेआरने ४ विकेट गमावून २०६ धावा केल्या. आरआरकडून जोफ्रा आर्चर, रियान पराग, महिश टेकश्ना आणि युधवीर सिंग यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# राज्यात भाजप सामाजिक तेढ निर्माण करतायेत : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

● **परभणी । वीरभूमी –**

भक्त प्रल्हादाची जी भक्ती आहे तशीच भक्ती काँग्रेस जनांच्या आचार, विचार आणि उच्चारातून दिसत आहे. आपण काँग्रेस काँग्रेस म्हणत आहोत तर दुसरा रावणाचा छळणारा विचार आहे तो पक्षांतर करा म्हणतो, आमचेच बरोबर आहे हे सांगतो. भक्त प्रल्हादाच्या भक्तीने नृसिंहाचा अवतार झाला तसाच नृसिंह अवतार ईव्हीएम किंवा बॅलेट पेपरमधून होईल आणि राक्षसरूपी भाजपचे खलत्व नष्ट केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

सामाजिक सलोखा व सद्भाव वाढीस जावा यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली परभणीत आज सद्भावना पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते आ. सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री नितीन राऊत यांच्यासह अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, खा. डॉ.कल्याण काळे, खा. रविंद्र चव्हाण, माजी मंत्री सुरेश वरपुडकर, रमेश बागवे, काँग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, प्रदेश सरचिटणीस संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, माजी आ. मोहन जोशी, माजी खा. तुकाराम रेंगे पाटील, माजी आ. सुरेशदादा देशमुख, प्रदेश प्रतिनिधी एकनाथ मोरे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, अनुसुचित जाती विभागाचे अध्य सिद्धार्थ हत्तीअंबीरे, परभणी शहर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार, प्रदेश सरचिटणीस ब्रिज दत्त, रामचंद्र दळवी, रामभाऊ घाडगे, केदार सोळंके, भगवान वाघमारे, बाळासाहेब आकात, इरफान उर रहेमान, डॉ. जफर अहमद खान, मुजाहिद खान, केदार साळुंके, अभय देशमुख, सुहास पंडित, नदिम इनामदार, बालाजी चव्हाण, आनंद चव्हाण, ॲड. मुजाहेद, प्रा. यशपाल भिंगे, अनिल पटेल, बाळासाहेब रेंगे, शिवाजी बेले, धोंडीराम चव्हाण, अमोल जाधव, तुकाराम साठे, शमी अहमद खान, सुनील देशमुख, गुलमीर खान, गोविंद यादव, प्रल्हाद पारवे, अनिल घांडगे, बाबासाहेब आवचार, सुदर्शन कदम, विलास अप्पा देशमुख, व्यंकटेश काळे, अजय चव्हाण यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी पोखर्णी येथे श्री नृसिंहाचे दर्शन घेऊन सद्भावना पदयात्रेची सुरुवात झाली. यावेळी बोलताना काँग्रेस




प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, राज्यात सामाजिक तेढ निर्माण करण्याचे काम केले जात आहे. परभणीतही अशाच एका घटनेने या भागात सामाजिक द्वेष पसरवण्याचा प्रकार झाला. राज्यातील सामाजिक तणाव कमी करण्याच्या हेतूने व सद्भावना आणि सौहार्द निर्माण करण्यासाठी ही काँग्रेस पक्षाने सद्भावना पदयात्रा आयोजित केली आहे. याआधी बीड जिल्ह्यात मस्साजोग ते बीड, नागपूर आणि नाशिकमध्ये सद्भावना पदयात्रा काढण्यात आली तर काल परळीत सद्भावना सत्याग्रह करण्यात आला आणि आज परभणीत सद्भावना यात्रा काढली असल्याचे सांगितले.

SPOT NEWS

## कान्हेगाव येथे नृसिंह पुराण कथेचे आयोजन

● **कोपरगाव । वीरभूमी-**

तालुक्यातील कान्हेगाव येथे सालाबाद प्रमाणे यावर्षी



श्री नरसिंह नवरात्र उत्सव निमित्ताने नरसिंह पुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ३/५/२०२५ ते दिनांक ११/५/२०२५ पर्यंत भागवत कथाकार ह. भ. प. योगेश महाराज करंजीकर यांच्या सुश्राव्य वाणीतून सायंकाळी ७ ते ९ वा .कथा ऐकावयास मिळणार आहे. तसेच दिं.१२/५/२०२५ रोजी सकाळी दहा वाजता काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी ज्ञानामृत व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ व सप्ताह कमिटी, कान्हेगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाचे बुद्ध विहार तेथे बुध्द रुप उपक्रम

● **नगर । वीरभूमी-**

शहरातील तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने बुद्ध विहार तेथे बुध्द रुप! हा उपक्रम हाती घेण्यात आला असून, याअंतर्गत भव्य बुध्द मुर्ती समाजबांधवांना बुद्ध विहारासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू आहे. सोसायटीचे अध्यक्ष संजय कांबळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु असून, शिरुर कासार (ता. आष्टी) येथे भव्य बुध्द रुप दान करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पार पडलेल्या या सोहळ्याला खासदार निलेश लंके यांनी उपस्थित राहून तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या माध्यमातून सुरु असलेल्या धार्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले. खा. लंके म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून धार्मिकतेला सामाजिक चळवळीची जोड देवून कार्य सुरु आहे. संजय कांबळे हे चळवळी मधील कार्यकर्ते असून, धम्माचा प्रचार-प्रसार करुन समाजाला जोडण्याचे काम करत आहे. गोर-गरीब व अनाथांचे लग्न लावून देण्यासह धार्मिकतेने युवक-युवतींना दिशा देण्याचे कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यातून सर्व समाजाला भगवान गौतम बुध्दांचे विचार समजणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली. भंन्ते धम्मपाल व भंन्ते नागसेन यांनी बुध्द वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात केली. याप्रसंगी संजय कांबळे, डॉ. सितांताई भिंगारदिवे, गौतमी भिंगारदिवे, माजी नगरसेवक राहुल कांबळे, डॉ. वानखडे, डॉ. विश्वास गायकवाड, प्रा. रमेश पगारे, ग्रामपंचायत सदस्स सुनिल जाधव, शेखर पंचमुख, शिवाजी भोसले, अशोक बागुल, आण्णा गायकवाड, संगीता घोडके, अनिता पंडित, कुसुम भिगारदिवे, लता भिंगारदिवे, मायाताई जाधव, सरिता गांगुर्डे, अविनाश भोसले, युवराज सोनवणे, विजय कांबळे, सुरेश पानपाटिल, बाळासाहेब बनकर, प्रमोद शिंदे, संतोष गायकवाड, शाम वाघचौरे, संदिप वाघमारे, भरत शिरसाठ, बाळू गायकवाड, सुभाष कांबळे, नितिन साळवे, विजय साळवे, संतोष कांबळे, मिलिंद आंग्रे, सिध्दांत कांबळे, विष्णू ठोंबे, सुरेश भिंगारदिवे, जिवा कांबळे, अनिकेत भिंगारदिवे, प्रकाश कांबळे, धोडिंबा राक्षे, राम गायकवाड, शांताराम बनसोडे, प्रशांत शिंदे, भिमराज शिंदे, शिवचरण लाल, शरद बनसडे आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. संजय कांबळे म्हणाले की, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असलेले बुद्ध विहार सक्षम करुन समाज जोडण्याचे काम थागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाने हाती घेतले आहे. प्रत्येक बुद्ध विहारात चांगल्या पध्दतीने भव्य असे बुध्द रुप असणे आवश्यक आहे. अनेक बुद्ध विहारात बुध्द रुप नसल्याने ते उपलब्ध करुन देण्याचे कार्य सुरु आहे. फक्त मुर्ती नव्हे तर बुध्दांचे विचार देखील देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून सुरु आहे. धम्माच्या जागृतीचे बीज रोवण्याचा प्रयत्न आहे. तथागत बुद्धिस्ट सोसायटी ही संस्था बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन योगदान देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बुद्ध विहार तेथे बुध्द रुप हा उपक्रम फक्त धार्मिकतेपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक ऐक्य, ज्ञानप्रसार आणि प्रेरणादायी विचारांच्या प्रसाराचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. अशा कार्यक्रमांद्वारे समाजजागृती व बौद्ध विचारांची रुजवणूक ही काळाची गरज असल्याची भावना भंन्ते धम्मपाल व भंन्ते नागसेन यांनी व्यक्त केली.

# कांदा अनुदान घोटाळ्यात जिल्हा सत्र न्यायालयाचे ताशेरे

**श्रीगोंदा बाजार समितीत सुमारे पावणे दोन कोटींच्या पुढे रकमेचा झाला होता घोटाळा**

● **श्रीगोंदा । वीरभूमी-**

श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीत सन २०२२/२३ च्या राज्य सरकारच्या कांदा अनुदान वाटप प्रकरणात १ कोटी ८८ लाख रुपयांचा अपहार झाला होता. या प्रकरणांमध्ये जवळपास १६ जण आरोपी करण्यात आले होते. त्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव दिलीप लक्ष्मण डेबरे हे मुख्य आरोपी होते. त्याचबरोबर इतर कांदा व्यापारी व हमाल आडते मापारी तोलायदार यांचा देखील या गुन्ह्यामध्ये सहभाग होता. मात्र या गुन्ह्याचा अहवाल बनवत असताना विशेष लेखापरीक्षक वर्ग-एक राजेंद्र निकम यांनी जाणीवपूर्वक आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांना व घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार सहकारी संस्था, श्रीगोंदा उपनिबंधक अभिमान थोरात व तालुका लेखा परीक्षक महेंद्र घोडके यांना वाचवण्याचा प्रयत्न केला व प्रत्यक्षात गुन्हा नोंदवतेवेळी या दोघांचा गुन्ह्यांमध्ये सहभाग असून देखील त्यांची नावे या गुन्ह्यातून वगळली होती. त्यामुळे या प्रकरणाचा पाठपुरावा करत असलेले सामाजिक कार्यकर्ते टिळक भोस यांनी याप्रकरणी सातत्याने पाठपुरावा करत राज्य सरकारकडे अभिमान थोरात व महेंद्र घोडके यांना आरोपी करण्याची मागणी केली होती. परंतु शासकीय अधिकाऱ्यांनी त्याची कोणतीही दखल घेतली नव्हती.



घोटाळ्यातील आरोपींनी जामीन अर्ज दाखल केला असता टिळक भोस यांनी स्वतः मा.जिल्हा सत्र न्यायालय, श्रीगोंदा यांच्याकडे स्वतः उपस्थित राहून तोंडी व लेखी युक्तिवाद केला. मा.न्यायालयाने जामीन प्रकरणातील सर्व पुरावे स्वतः मांडले. तसेच कांदा अनुदान घोटाळा प्रकरणात सचिव दिलीप डेबरे हे एकटेच गुन्हेगार नसून त्यांच्यासोबत मुख्य सूत्रधार म्हणून अभिमान थोरात व महेंद्र घोडके यांचा देखील प्रमुख सहभाग असल्याचे कागदोपत्री निष्पन्न करण्यात आली. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने माननीय न्यायालयाने त्याची वस्तुनिष्ठ माहिती घेऊन सर्व पुरावे पाहिले.

सदरील जामीन अर्जाचा निकाल देतेवेळी न्यायालयाने तपासावरती गंभीर शंका व्यक्त करत आपले मत नोंदवताना प्रथमदर्शनी अभिमान थोरात व महेंद्र घोडके हे सदरील गुन्ह्यातील मुख्य आरोपी असल्याबाबत म्हटले आहे. तसेच तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभाकर निकम यांनी या गुन्ह्याचा तपास हा आरोपींना शोधून त्याच्याविरुद्ध असलेला भक्कम पुरावा गोळा करण्यासाठी चाललेला नसून आरोपींना जास्तीत जास्त मदत कशी करता येईल या अनुषंगाने चाललेला दिसून येतो. तपासी अधिकारी निकम यांना शासनाचा १ कोटी ८८ लाख रुपये इतक्या गंभीर आर्थिक घोटाळ्याची तपास वरिष्ठ अधिकाऱ्याकडे असणे अपेक्षित आहे.असेही मत न्यायालयाने व्यक्त केले आहे.

तसेच मा.न्यायालयाने सहाय्यक सरकारी वकील यांना आदेशित केले यांनी या आदेशाची प्रत ही गृह विभाग महाराष्ट्र शासन व पोलिस महासंचालक महाराष्ट्र राज्य तसेच सचिव सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांना त्यांच्या खात्यातील अधिकाऱ्यांचे कार्य अवगत करण्यासाठी व त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यासाठी पाठवण्यात यावी. या करिता मा. जिल्हा व सत्र न्यायालय मुजीब शेख यांनी आदेश दिले आहेत.

### मंत्रिमंडळ बैठक उधाळण्याचा टिळक भोस यांचा इशारा

■ मा.मुजीब शेख साहेब जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी भ्रष्टाचाराची दखल घेत.अत्यंत वस्तुनिष्ठपणे आदेश दिलेला आहे. त्यामुळे अभिमान थोरात व महेंद्र घोडके यांवर गुन्हे दाखल करणे गरजेचे आहे. तसेच तपासी अधिकारी प्रभाकर निकम यांनी तपासात अनेक चुका केल्या आहेत. तसेच राजेंद्र निकम (जिल्हा लेखापरीक्षक) यांनी देखील थोरात व घोडके यांना वाचवण्याचा प्रयत्न करून शासनाची फसवणूक केली आहे. त्यामुळे अभिमान थोरात, महेंद्र घोडके, राजेंद्र निकम, प्रभाकर निकम हे सर्व आरोपी आहेत. त्यामुळे सर्वांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत. अन्यथा चौंडी येथील मंत्रिमंडळ बैठक उधळण्यात येईल, असा इशारा टिळक भोस यांनी दिला.

## निंबळक येथे संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला प्रारंभ

● **नगर । वीरभूमी-**

नगर तालुक्यातील निंबळक येथे संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला भक्तिभावपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. हा धार्मिक सोहळा शुक्रवार, ९ मे पर्यंत दररोज संध्याकाळी ६ ते ९.३० या वेळेत संपन्न होणार आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त तसेच जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या ३६५ व्या वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त व वै. लक्ष्मण रंगनाथ काळे, वै. विजयादेवी लक्ष्मण काळे तसेच वै. अजित लक्ष्मण काळे यांच्या पुण्यस्मरणार्थ मराठा समन्वय परिषद महाराष्ट्र राज्याच्या कार्याध्यक्ष अनिता काळे यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. निंबळकच्या सरपंच सौ. प्रियंका लामखडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी श्रीनिवास महाराज घुगे, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे, युवा उद्योजक अजय लामखडे, उपसरपंच बाळासाहेब कोतकर, साहेबराव बोडखे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

सरपंच प्रियंका लामखडे म्हणाल्या की, धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. संतांचे विचार नव्या पिढीला मार्गदर्शक ठरतात. आपल्या देशाला लाभलेला धार्मिक व सांस्कृतिक वारसा जपणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

अनिता काळे म्हणाल्या की, आपल्या देशातील संतांची शिकवण संपूर्ण जगासाठी प्रेरणादायक आहे. पौराणिक ग्रंथ व रामकथा ही भारतीय संस्कृतीची महत्त्वाची शिदोरी आहे. निंबळक येथील राम कथेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. सद्गुरु हृदय निवासी विठ्ठल बाबा देशमुख यांचे शिष्य श्रीनिवास महाराज घुगे कथेचे निरुपम करणार आहेत. रोज सायंकाळी सहा ते साडेनऊ या दरम्यान कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे. निंबळक येथील सार्थक मंगल कार्यालयामध्ये हा सोहळा संपन्न होत आह. सोहळ्यानिमित्त कथा तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. संगीत राम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे पंचक्रोशीतील ग्रामस्थांचा पहिल्याच दिवसापासून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## पाथर्डी शहरासह तालुक्यात बीएसएनएलच्या सेवेचा बोजवारा; सुधारणा न झाल्यास आंदोलनाचा इशारा

● **पाथर्डी । वीरभूमी-**

जुनाट यंत्र सामग्री, ठिकठिकाणी चाललेल्या रस्त्याच्या कामांमुळे तुटलेल्या केबल दुरुस्त करण्यासाठी अपुरे मनुष्यबळ यामुळे शहरातील बीएसएनएल मोबाइल सेवेचा पुरता बोजवारा उडाला असून अनेक ग्राहकांनी अन्य कंपन्यांचे कार्ड घेण्यासाठी किंवा कार्ड पोर्ट करण्यासाठी अन्य कंपन्यांच्या शोरूममध्ये धाव घेतली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून बीएसएनएलच्या मोबाईल सेवेमध्ये वारंवार व्यत्यय येऊन शहराच्या विविध भागांमध्ये सुद्धा समान रेंज मिळत नाही. तक्रारींची सुद्धा दखल घेतली जात नाही. खुद्द बीएसएनएल ऑफिसमध्ये जाऊन बसले तरी कमी जास्त रेंज होते.कसबा विभागात तर घराच्या बाहेर येऊन बोलावे लागते. याच कंपनीकडून अन्य कंपन्यांनी मोबाईल सेवेसाठी टॉवर घेतले. त्यांचा पुरवठा मात्र अविरत सुरू असून बीएसएनएल सेवेकडे मात्र कोणाचेही लक्ष नाही. स्थानिक पातळीवर कार्यालयामध्ये तक्रारीसाठी असलेला फोन उचलला गेला तर ग्राहकांच्या दृष्टीने तो भाग्याचा क्षण समजला जातो. एकमेव अधिकारी येथे बसून ग्राहकांची समजूत काढतात. वरिष्ठ अधिकारी तालुक्याच्या प्रश्नाकडे फारसे गांभीर्याने बघत नाहीत. अपुरी साधन सामग्री असल्याने आम्ही काही करू शकत नाहीत असे ठराविक उत्तर दिले जाते. तालुक्यामध्ये मढी, मोहटादेवी, वृद्धेश्वर, हनुमान टाकळी, भगवानगड अशी प्रमुख देवस्थाने आहेत. राज्याच्या विविध भागातून येथे भाविक येतात. मोबाईल सेवेसाठी मात्र त्यांना इतर कंपन्यांचा आधार घ्यावा लागतो. बीएसएनएलची ४-जी सेवा म्हणजे निव्वळ बुजगावणे ठरले असून ऑफिसमध्ये कार्ड रूपांतरित करण्यासाठी माणसे सापडत नाहीत. बाहेर पैसे देऊन कार्ड करून घ्यावे लागते. मोबाईलमध्ये वाजणारी कॅसेट वेगळीच डोकेदुखी ठरते. अशा परिस्थितीमध्ये ग्राहकांच्या सहनशीलतेचा अंत भारत संचार निगम कडून बघितला जात आहे. याबाबत अधिकारी, पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी तक्रार करूनही वरिष्ठ अधिकारी दाद देत नाहीत. त्यामुळे खासदार निलेश लंके यांचे मार्फत संसदेमध्ये पाथर्डी तालुक्यातील बीएसएनएल सेवेचा उडालेला बोजवाराकडे लक्ष वेधण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला आहे. जिथे रस्त्याची कामे चालू आहेत तेथे आम्हाला कळवले जात नाही. ठेकेदार अत्याधुनिक यंत्रसामग्रीने रस्ते उखडतात. सेवा बंद पडल्यानंतर आम्हाला कळते काहीतरी घोटाळा झाला आहे. असे कर्मचारी सांगतात.

करंजी घाट, शेवगाव रस्ता, पाथर्डी शहरातील पिण्याच्या पाण्याच्या योजना, भूमिगत गटारी योजना, पालिकेची विकास कामे यासाठी ठेकेदाराकडून यंत्रसामुग्री वापरली जाते. दोन विभागांमध्ये समन्वय नसल्याने ग्राहकांचे मात्र अतोनात हाल होत आहेत. गेल्या आठ दिवसांपासून केबल तुटली या कारणासाठी ग्राहकांना प्रभावी सेवा मिळत नाही. मोहटादेवी देवस्थान कडून गेल्या दहा वर्षांपासून स्वतंत्र टॉवरची मागणी होत आहे. वृद्धेश्वर देवस्थानकडून टॉवरची मागणी होत आहे. उत्पन्नाची साधने असलेल्या ठिकाणी कंपनीचे लक्ष नाही. सुलभ दळणवळण व्यवस्था मिळत नसल्याने तालुक्याचा सुद्धा आर्थिक विकास मंद गतीने होत आहे. याबाबत तातडीने सुधारणा न झाल्यास कुठल्याही क्षणी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते बंडू पाटील बोरुडे, तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, शहराध्यक्ष देवा पवार आदींनी दिला आहे.

# कोपरगाव भाजपा नूतन शहराध्यक्ष वैभव आढाव यांचा नागरी सत्कार

● **कोपरगाव । वीरभूमी-**

मित्र फाऊंडेशनचे संस्थापक वैभव आढाव यांची भारतीय जनता पार्टी कोपरगाव शहराध्यक्ष पदी निवड झाल्याच्या अनुषंगाने, मित्र फाऊंडेशन आणि वैभव आढाव मित्र परिवार यांच्या वतीने भव्य जाहीर नागरी सत्कार समारंभ रविवार, ४ मे २०२५ रोजी व्यापारी धर्मशाळा, कोपरगाव येथे संपन्न झाला.

समारंभाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या समवेत वैभव आढाव यांनी दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आणि संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून आणि वंदन करून करण्यात आली.

या प्रसंगी संजीवनी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, संजीवनी शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुमितदादा कोल्हे, माजी गटनेते रविंद्रअण्णा पाठक, दिलीपराव दारुणकर, बाळासाहेब नरोडे, माजी शहराध्यक्ष डी. आर. काले, माजी नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे सोनवणे, विजयराव आढाव आदीसह आजी माजी नगरसेवक, विविध पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी, प्रतिष्ठित मान्यवर, मित्र फाउंडेशनचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी भारतीय जनता पार्टीचे नव्याने नियुक्त शहराध्यक्ष वैभव आढाव यांचा नागरी सत्कार करण्यात आला आणि त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बोलताना नितीनदादा कोल्हे म्हणाले अतिशय योग्य वेळी वैभव आढाव यांना पक्षाने संधी दिली आहे. नेतृत्वाने टाकलेल्या विश्वासाला ते सार्थ न्याय देतील आणि समाज आणि परिसराची सेवा या संधीतून करतील. अतिशय निकटचे संबंध कोल्हे परिवार आणि आढाव परिवाराचे आहेत त्यामुळे वैभव आढाव यांना परिवारातील एक सदस्य या भावनेने आशीर्वाद आहेत त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करावे. मोठ्या संख्येने मित्र परिवार उपस्थित राहिल्याचे कौतुक करत ही खरी ऊर्जा आहे ज्यामुळे कामाचा उत्साह वाढतो असे म्हणाले.

युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी मित्र फाउंडेशन हे दीडशे पेक्षा अधिक रक्तदान शिबिरे घेणारे संघटन वैभव आढाव यांनी जपले आहे. उत्तम संघटन आणि मितभाषी स्वभाव यामुळे मोठा मित्रपरिवार त्यांनी शहरासह ग्रामीण भागात देखील जोडला आहे. येणाऱ्या कालखंडात नगरपालिका निवडणुका आहेत त्यात मोठा विजय आपल्याला खेचून आणण्यासाठी वैभव आढाव यांचा कार्यकाळ महत्वाचा ठरणार आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाने पक्ष भरारी घेतो आहे. जगातील सर्वात मोठा पक्ष आणि मतदारसंघातील देखील सर्वात मोठा पक्ष असणारा भाजपा आहे. बिपीनदादा कोल्हे, मा.आ.स्नेहलताताई कोल्हे यांचे मार्गदर्शनाखाली उत्तम काम करण्यासाठी वैभव आढाव यांना पक्षाच्या वाढीसाठी बळ देणार असल्याचे विवेकभैय्या कोल्हे म्हणाले.

यावेळी वैभव आढाव यांनी ही संधी दिल्याबद्दल नेतृत्वाचे आभार मानले. मित्र परिवाराने आयोजित केलेल्या सत्काराने अधिक ऊर्जा मिळाली असून मतदारसंघातील नेतृत्व आणि पक्ष पाठीशी असल्याने पक्ष संघटना वाढीसाठी झोकून देऊन काम करणार असल्याचे मत व्यक्त केले.

SPOT NEWS

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयास कर्मवीर पारितोषिक जाहीर

● नगर । वीरभूमी-

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयास संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे सर्वोत्कृष्ट कामगिरीच्या गौरवार्थ कर्मवीर पारितोषिक नुकतेच जाहीर झाले आहे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६६ व्या पुण्यतिथी निमित्ताने ९ मे रोजी संस्थेचे अध्यक्ष तथा खासदार शरद पवार यांच्या हस्ते हे मानाचे पारितोषिक सातारा येथील कर्मवीर समाधी परिसरात होणाऱ्या कार्यक्रमात शाळेला सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेतील सर्वाधिक गुणवत्ता प्राप्त विद्यालयाचे पुनर्मूल्यांकन करून दिला जाणारा हा सर्वोच्च गुणवत्तेचा मानाचा पुरस्कार आहे. सदर पारितोषिक मिळण्यामध्ये विद्यालयातील सर्व सेवक व विद्यार्थी यांचे योगदान आहे. विद्यालयात सर्व सेवकांना बरोबर घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने पूर्णपणे प्रयत्न केला जातो. या विद्यालयाच्या गुणवत्ता विकासाच्या वाढीसाठी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले आहे. तसेच स्व. शंकरराव काळे यांचे या विद्यालयावर विशेष प्रेम होते. मागील कालखंडात त्यांचे विशेष योगदान या विद्यालयास मिळाल्याने विद्यालयास हे पारितोषिक प्राप्त झालेले आहे. शाळेस पुरस्कार मिळाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा शाळा समितीचे अध्यक्ष दादाभाऊ कळमकर, संस्थेच्या उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेवराव पांडुळे, अर्जुनराव पोकळे, अभिषेक कळमकर, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, अंबादास गारुडकर, विश्वासराव काळे, कैलासराव मोहिते, विष्णुपंत म्हस्के, श्यामराव व्यवहारे यांनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया काकडे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा मार्गदर्शक शिवाजी लंके, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी यांचे विशेष अभिनंदन करून कौतुक केले.

## शेतकरी कर्जमाफी व इतर घोषणांची पूर्तता करा : भाकप

● नगर । वीरभूमी-

चौंडी (ता. जामखेड) येथे मंगळवारी (दि. ६ मे) रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. या बैठकीस मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्वच मंत्री उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्ष व अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात येणार आहे. निवेदन देण्यासाठी मंगळवारी सकाळी ११ वाजता उपस्थित राहण्याचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवाहन करण्यात आले आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ड. सुभाष लांडे, जिल्हा सचिव अँड. बन्सी सातपुते, अँड. सुधीर टोकेकर, संतोष खोडदे, संजय नांगरे तसेच अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. बबनराव सालके, सेक्रेटरी आप्पासाहेब वाबळे व उपाध्यक्ष बापूराव राशिनकर यांनी ही माहिती दिली. विधानसभा निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सध्या कर्जमाफी शक्य नसल्याचे स्पष्ट केल्यामुळे शेतकरी वर्गात मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत सरकारला जाग आणण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना भेटून निवेदन देणार आहे. राज्य सरकारने निवडणुकीच्या वेळी बेरोजगार तरुणांना दरमहा १० हजार रुपये भत्ता देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच लाडकी बहिण योजनेअंतर्गत महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती.

# दगडवाडी येथील शेतकऱ्यांच्या बागेतून डाळिंबाची चोरी

## सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान । वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी हवालदिल

● पाथर्डी । वीरभूमी-


पोटच्या मुलाप्रमाणे डाळिंबाच्या झाडांची निगा राखली.... कुटुंबीयांसारखे पालन पोषण केले.... दररोज बागेत मुक्काम करत डाळिंबाचे रक्षण केले.... मुलाच्या वाढदिवसाला एक दिवस घरी थांबलो... चोरट्यांनी डाव साधला.... जीवापाड जपलेले सुमारे दीड लाख रुपयांचे डाळिंब चोरून नेले...... तालुक्यातील दगडवाडी येथील शेतकरी चंद्रकांत विष्णु शिंदे डबडबल्या डोळ्यांनी चोरीची घटना सांगत होते.



सुमारे दोन एकर क्षेत्र वर त्यांनी अत्यंत परिश्रमाने डाळिंबाची बाग फुलवली. दोन-तीन वर्ष न चुकता, सणवार बघितला नाही, सुखदु:खाच्या घटना बघितले नाहीत, दिवसभर कोठेही फिरले मात्र रात्रीचा मुक्काम डाळिंबाच्या भागातच असायचा. गेल्या काही दिवसांपासून पाणीटंचाई वाढल्याने टँकरचे विकतचे पाणी घेऊन त्यांनी बाग जगवली. परिसरातील निवडक उत्कृष्ट बागांपैकी ती एक बाग होती. संपूर्ण कुटुंब अहोरात्र परिश्रम करी. शुक्रवारी रात्री मुलाचा वाढदिवस होता. कुटुंबीयांनी खूप आग्रह केल्यामुळे त्यांच्या समाधानासाठी म्हणून चंद्रकांत हे रात्री घरी मुक्कामाला राहिले. मात्र त्यांना झोप येत नव्हती. सारखी बागेची आठवण येत होती. रात्री उशिरा गोडधोड जेवण करत सर्वजण झोपी गेले. सकाळीच लवकर उठून चंद्रकांत शेतात गेले. तेथे बघितले तर सुमारे २० ते २५ कॅरेट डाळिंब चोरट्याने चोरून नेले. बाजारभावाने त्याची किंमत दीड लाख रुपयांहून अधिक आहे. गेले सुमारे तीन वर्षांपासून डाळिंबाची रोपे लावल्यापासून आरशासारखी शेती स्वच्छ ठेवत त्यांनी झाडांची निगा केली. डाळिंबाची झाडे व त्यांचे भावनिक नाते बनून मुलाच्या शिक्षणासाठी व कुटुंबाच्या देखभालीसाठी आपल्याला भरपूर पैसे मिळतील, खाजगी लोकांचे देणे घेणे मिटवून टाकू. अशी स्वप्ने रंगवत असतानाच चोरट्याने अगदी पाळत ठेवून डाव साधला.

काही तासातच होत्याचे नव्हते झाले. बागेमध्ये सुमारे साडेतीनशे डाळिंबाची झाडे आहेत. सर्व झाडांना अतिशय उत्तम दर्जाची रस रशीत फळे लगडली होती. करंजी, सातवड, दगडवाडी, भोसे, कानोबावाडी, देवराई, घाटशिरस आशा पट्ट्यामध्ये विविध प्रकारच्या फळबाग आहेत. बहुसंख्य शेतकरी डोळ्यात तेल घालून चोरट्यांपासून बागांचे रक्षण करतात. वाढदिवसानिमित्त संबंधित शेतकरी रात्री मुक्कामाला बागेत नाही, याची अचूक माहिती मिळाल्यानंतर चोरट्यांनी डाव साधल्याने चोरटे परिसरातीलच असावे असा अंदाज ग्रामस्थांनी लावला आहे.

## चंद्रकांत म्हस्के यांचे निधन



● पाथर्डी । वीरभूमी-

पाथर्डी तालुक्यातील निंबोडी गावचे सुपुत्र, जिल्हा सहकारी बँकेचे माजी व्हाईस चेअरमन, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे संदस्य चंद्रकांत म्हस्के पाटील यांचे शुक्रवारी रात्री दु:खद निधन झाले. स्व. म्हस्के यांना राजकीय क्षेत्रासह शिक्षण व सामाजिक क्षेत्रात आण्णा या टोपण नावाने ओळखले जायचे. तालुक्यासह जिल्हातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत स्व. आण्णांना अखेरचा निरोप देण्यात आला.

पाथर्डी तालुक्यासारख्या दुष्काळी भागात जिल्हा सहकारी बँकेचे माध्यमातुन शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न सोडविणारा नेता म्हणुन ओळख असलेल्या म्हस्के पाटील यांनी तब्बल ४० वर्षे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक म्हणुन काम केले. ते सलग १५ वर्षे जिल्हा सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन होते. जिल्हा मराठा समाज प्रसारक शिक्षण मंडळावर काम करताना त्यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणुन खेडोपाडी विद्यालये उभे करुन शिक्षणाचे जाळे निर्माण केले. चंद्रकांत म्हस्के पाटलांना अण्णा या टोपण नावाने तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यात ओळखले जायचे. विधानसभा, जिल्हा परिषद या सारख्या अनेक मोठ्या निवडणुका त्यांनी लढविल्या होत्या. तालुक्यात त्यांना मानणारा मोठा चाहता वर्ग होता. आज सकाळीच नऊ वाजता अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. मृत्युसमयी ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्यामागे ३ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सर्व सामान्य व शेतकऱ्यांसाठी लढणारे नेतृत्व हरपले अशा शब्दात अनेकांनी दु:ख व्यक्त केले.

## मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

● नगर । वीरभूमी-

शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुली बुद्धिबळ स्पर्धेचे बुधवारी ७ मे ते रविवार ११ मे २०२५ पर्यंत अहिल्यानगरच्या सप्तक सदन, जुना कापड बाजार येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली. या स्पर्धेत भारतातून बुद्धिबळ खेळाडू खेळण्यासाठी येणार असून आत्तापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र इत्यादी राज्यातून अडीचशेच्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. फीडे मास्टर वेदांत पानसरे (मुंबई), इंटर नॅशनल मास्टर राहुल सगमा (गोवा), इंटरनॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी (महाराष्ट्र) सहित अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत असे अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले. साडेपाच वर्षाचा



बाल खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपले बुद्धीचे बळ पणाला लावणार आहे असे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

बुधवार ७ मे रोजी सकाळी ११.३० वाजता ह्या स्पर्धेचे उद्घाटन होणार असून त्यानंतर स्पर्धा सुरू होणार आहे. या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत शेवटी रविवार दि. ११ दुपारी ३.०० अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

या स्पर्धेत विविध गटात प्रोत्साहन पर रोख बक्षिसे, आकर्षक ५० करंडक व सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेचे प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जळगाव) हे असून त्यांना शार्दुल टापसे (सातारा), पवन राठी सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. ह्या दोघांना ६ सहाय्यक पंच मदत करणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या नियम नियमावली नुसार होणार आहे.

तसेच या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी पट व सोंगट्या चा वापर महाराष्ट्रात पहिल्यांदा होणार आहे. अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत गंगेकर, देवेंद्र ढोकळे, मनीष जस्वानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, सौ.शुभदा ठोंबरे, सौ.रोहिणी अडकर आदी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अहमदनगर शहरातील खेळाडूंनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच वरील स्पर्धेत अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संपर्क यशवंत बापट. ९३२६०९२५०१ व पारुनाथ ढोकळे ९८५०७०४२६८.

# आपल्या भुमितील सन्मान जीवनातील उत्कृष्ठ असतो

## खा. निलेश लंके । पारनेर भुषण पुरस्काराचे वितरण

● पारनेर । वीरभूमी-

सामाजिक जीवनात काम करताना कोणतीही अपेक्षा न बाळगता काम करून आपल्या कामाची दखल घेत आपल्या माणसाने पुरस्कार रुपी कौतुकाची थाप दिली तर तो सन्मान सोहळा जीवनातील सर्वात आनंदाचा क्षण असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. निलेश लंके यांनी केले.

पारनेर येथे कृषी व जनविकास प्रतिष्ठाणकडून दिला जाणारा 'पारनेर भुषण पुरस्कार' वितरण सोहळा मोठ्या थाटात पार पडला. त्या प्रसंगी पुरस्कारार्थींचे कौतुक करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राळेगण सिद्धीचे सरपंच सदाशिव मापारी होते.

खा. लंके पुढे बोलताना म्हणाले की, कृषी आणि जनविकास प्रतिष्ठाणने सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तिना पारनेर भुषण पुरस्कार देऊन गौरव केला याचा अभिमान वाटतो. सामाजिक काम करणाऱ्याची दखल घेतल्याने प्रतिष्ठणचे अध्यक्ष अरुण आंधळे पाटील यांचे कौतुक केले व पुढील काळात मदत करण्याचे आश्वासनही दिले.



पहिला पारनेर भूषण पुरस्कार विविध क्षेत्रातील १८ व्यक्तींना जाहीर झाला होता. यामध्ये किर्तन, प्रवचन व समाज प्रबोधनकार हभप. बजरंग महाराज आंधळे, (आळंदी देवाची), ह.भ.प. जोत्सनाताई विनायक मुळे, कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट बाजार समिती पुरस्कार पारनेर कृषी उत्पन्न बाजार समिती, आदर्श सरपंच सौ. ताराबाई दिनकर कदम, (काळकुप ग्रामपंचायत), सामाजिक कार्यातील पुरस्कार डॉ. सुनील कृष्णराव औटी (पारनेर), रक्तदान व आरोग्य सेवा पुरस्कार रमीज राजे (पारनेर), पारनेर तालुक्यातील उत्कृष्ट महिला पत्रकार निलम सुरेश खोसे, समाजसेवा पुरस्कार भास्करराव बबन उंडे, उत्कृष्ट वकृत्व स्पर्धा पुरस्कार अशोक शिंदे, पर्यटन व साहित्य क्षेत्रातील पुरस्कार आडवाटेच पारनेर ग्रुप, उत्कृष्ट महिला बचत गट संघटक वैशाली अडसूळ (काळकुप), दुग्ध व्यवसाय व समाजसेवा पुरस्कार संदीप रोहकले (भाळवणी), उत्कृष्ट शैक्षणिक क्षेत्र पुरस्कार, शिव मावळे कृतज्ञता प्रतिष्ठान (पारनेर), पारंपारिक कला लोकशाहीर पुरस्कार दत्ता जाधव करंदीकर, महिला लोककला पुरस्कार मनीषा दीपक चव्हाण (टाकळी ढोकेश्वर), महिला बचतगट संघटक जयश्री अमोल पवार (पोखरी), शिक्षण व समाज प्रबोधन क्षेत्रातील पुरस्कार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी किसनराव पावडे पाटील (दरोडी) यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी शिवसेना ज्येष्ठ नेते गुलाबराव नवले, पत्रकार संजय मोरे, अँड. कोमल जाधव, बलभिम कुबडे, नगरसेवक अर्जुन भालेकर, महेंद्र रोकडे, दत्ताशेठ आंधळे, सुरेश खोसे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान पूर्वक प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी लक्ष फाउंडेशन संचलित न्यू अर्पण व्हॅलेंटरी ब्लड सेंटर अहिल्यानगर यांच्या माध्यमातून व रमिजभैय्या राजे सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रेरणेतून समाजाशी बांधिलकी धरून येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या पहिल्याच गुणगौरव सोहळ्यास पारनेर तालुक्यातील जनतेने मोठ्या प्रमाणात उपस्थिती दाखविल्या बद्दल कार्यक्रमाचे आयोजक अरुणराव आंधळे यांनी प्रास्ताविक करून सर्वांचे आभार मानले.

## निमगाव वाघात चांदीची गदा पटकावणाऱ्या पैलवानांचा गौरव

● नगर । वीरभूमी-

निमगाव वाघा (ता. नगर) येथील यात्रा उत्सवानिमित्त कुस्तीच्या मैदानात मानाची चांदीची गदा पटकाविणारे गावातील कुस्तीपटू पै. संदिप डोंगरे व पै. महेश शेळके यांचा सन्मान करण्यात आला. निमगाव वाघा विविध कार्यकारी सोसायटीच्या वतीने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच यावेळी कुस्ती मैदानात पै. आकाश डोंगरे याने देखील उत्कृष्ट कुस्ती केल्याबद्दल त्याचा देखील सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब जाधव, उपसरपंच किरण जाधव, ग्रामपंचायत सदस्य तथा नगर तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, सोसायटीचे व्हाईस चेअरमन जालिंदर आतकर, संचालक अतुल फलके, गोरख निमसे, अरुण कापसे, संपत कापसे, नामदेव फलके, बबन शेळके, गुलाब केदार, अशोक कापसे, मच्छिंद्र काळे, संभाजी पाचारणे, ज्ञानदेव जाधव, तुकाराम फलके, सुनिल कापसे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब जाधव म्हणाले की, निमगाव वाघा गावाला कुस्तीची समृद्ध परंपरा लाभली आहे. ही परंपरा नव्या पिढीच्या माध्यमातून अधिक बळकट होत आहे, ही अभिमानाची बाब आहे. युवकांनी व्यसनमुक्त राहून व्यायामाकडे वळले पाहिजे. समाजाचे आरोग्य आणि कुटुंबाचे भविष्य घडविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे म्हणाले की, गावाच्या मातीतून घडणारे मल्ल हे आपल्या संस्कृतीचे वैभव आहेत. प्रत्येक यात्रा उत्सवामध्ये मल्लांना संधी देऊन त्यांचे मनोबल वाढवले जात आहे. याच प्रयत्नांतून आज गावातील मल्लांनी चांदीची गदा जिंकून गावाचे नाव उज्वल केले आहे.

नव्या पिढीतील मल्लांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन व व्यायामशाळा उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# राजूर घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्वच पाण्याचे स्त्रोत तपासावे

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । राजूर येथील काविळ बाधितांवर सुरु असलेल्या उपचाराची घेतली माहिती

**● अकोले । वीरभूमी–**

कावीळ साथरोग रोखण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजना करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. डॉक्टरांची टिम पूर्णवेळ थांबणार असून, रक्त तपासणीचे अहवाल तातडीने मिळण्यासाठी प्रवरा मेडीकल ट्रस्टच्या माध्यमातून विशेष यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. राजूरच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून जिल्ह्यातील सर्वच पाण्याचे स्त्रोत तपासण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

तालुक्यातील राजूर येथील कावीळच्या साथरोगाच्या कारणाने रूग्णांची संख्या २६३ इतकी झाली आहे. दोन रूग्णांचा मृत्यू झाल्यानंतर पालकमंत्री ना. विखे पाटील, आ. किरण लहामटे, माजी आमदार वैभव पिचड, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अतिरीक्त जिल्हाधिकरी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.नागोराव चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी राजूर येथे येवून ग्रामीण रूग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची भेट घेतली. डॉक्टरांकडून त्यांनी सुरू असलेल्या उपचारांची माहीती जाणून घेतली.

राजूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत ग्रामस्थ आणि रूग्णांसाठी उपचारांसाठी विशेष कक्ष उभारण्यात आला आहे. येथेही मंत्री विखे पाटील भेट दिली. उपस्थित ग्रामस्थ उपचार घेण्यासाठी आलेले रूग्ण तसेच वैद्यकीय यंत्रणेतील कर्मचार्यांशी संवाद साधून त्यांनी माहीती घेवून सूचना केल्या. रूग्णामध्ये मुल आणि मुलींची संख्या जास्त असल्याने त्यांच्या आहराबाबत तज्ञाकडून मार्गदर्शन घेण्याबरोबरच पालकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण कमी करण्यासाठी संमुपदेशन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

प्रकल्प कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत मंत्री विखे पाटील यांनी ग्रामस्थांच्या अडचणी समजून घेतल्या. प्रामुख्याने ग्रामपंचायती कडून झालेल्या दुर्लक्षामुळे पाणीपुरवठा दूषित झाल्याची तक्रार करण्यात आली. याची गंभीर दखल घेवून पालकमंत्री विखे पाटील यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांना तातडीने चौकशी करण्याचे आदेश दिले.

तलाठी, ग्रामसेवक मुख्यालयाच्या ठिकाणी थांबत नसल्याची बाब बैठकीत सांगण्यात आली. याबबातही पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना करून प्रशासनातील सर्व विभागांना साथ रोग कमी होईपर्यत मुख्यालय न सोडण्याच्या सूचना देण्यास सांगितले आहे.

गावातील सर्व कुटूंबियाचे सर्व्हेक्षण करण्यासाठी कोव्हीड संकटाप्रमाणे आशा सेविका सक्रीय करून घ्यावे. राजूर गावासह शेजारील गावांचेही सर्व्हेक्षणही करण्याबरोबरच पाण्यात टाकण्यासाठी लागणारे जंतूनाशक औषध, तसेच रक्त तपासणीच्या अहवालाकरीता लागणारी यंत्रणा जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासही त्यांनी जिल्हाधिकारी यांना सूचित केले.

रुग्णांचे रक्त नमुन्यांचे अहवाल उशिरा उपलब्ध होत असल्याने प्रवरा मेडीकल ट्रस्टचे पथक पाठविण्यात आले असून, उपचार करण्यासाठी पथकाने काम सुरू केले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. राजूर येथील प्रवरा ग्रामीण रूग्णालयात प्राथमिक उपचारांची सुविधा सुरू करण्यात आली आहे.





राजूर येथे दुषित पाण्यामुळे ओढवलेल्या प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेवून जिल्ह्यातील सर्वच ठिकाणच्या पाण्याचे स्त्रोत तपासण्याबाबत प्रशासानाने कार्यवाही करण्यास सांगितले आहे.

हे संकट रोखण्याची जबाबदारी सर्वांची असल्याने ग्रामस्थ आणि प्रशासनाने समन्वय राखून काम करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक

**● नगर । वीरभूमी–**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पक्ष कार्यालय राष्ट्रवादी भवन येथे पदाधिकारी आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीत जिल्हा प्रभारी माजी आ. अशोक बापू पवार, निरीक्षक अंकुशअण्णा काकडे, खा. निलेश लंके, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, कार्याध्यक्ष संदीप वर्पे, माजी आ. दादाभाऊ कळमकर, शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, महिला जिल्हाध्यक्ष योगिता राजळे, रामेश्वर निमसे, सिताराम काकडे, सुरज मोरे, महेंद्र शेळके, विजयसिंह गोलेकर, अशोक बाबर, सुरेश गडाख, हरिदास शिर्के, जावेद शेख, बाबा तरटे, बाबा भिटे, शौकत तांबोळी, किसनराव लोटके, अथर खान, शिवशंकर राजळे, रघुनाथ काळदाते, मच्छिंद्र सोनवणे, प्रकाश पोटे, सतीश थोरात, सुधीर मस्के, विशाल म्हेत्रे, विनोद साळवे, फारूक रंगरेज, आरिफ पटेल आदींसह सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, फ्रंटल सेलचे प्रमुख, सर्व प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.



प्रास्ताविक करतांना जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके म्हणाले की, निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे पडले त्याचा देखील निवडणुकांवर फरक झाला व नगर जिल्ह्यात लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीच्या पाच महिन्याच्या आतमध्ये १ लाख ३० हजार मतदान आले कुठून व वाढले कसे? याला अनेक गोष्टी कारणीभूत आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर चळवळीच्या विचारावर चालणारा पक्ष हा जातीयवादी पक्षाच्या नादी लागत नसून येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात पक्ष बळकटीकरण करणार आहे.

खा. लंके म्हणाले की, आपला जिल्हा शरदचंद्र पवार यांच्यावर प्रेम करणारा जिल्हा आहे व आपला कार्यकर्ता कितीही संकटात असला तरी त्याला ताकद देण्याची गरज आहे व येणाऱ्या काळात युवकांना मोठ्या प्रमाणात पक्षात काम करण्याची संधी भेटणार असून युवकांना पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात जोडणार असल्याची भावना व्यक्त केली.

निरीक्षक अंकुश काकडे म्हणाले की, पक्षाचे ध्येय धोरण तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कुटीबद्ध राहून प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला पक्ष कसा वाढवता येणार यासाठी प्रयत्न करावे व पक्ष देखील कार्यकर्त्यांसाठी सदैव पाठीशी उभा राहणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील प्रत्येक तालुकाध्यक्ष यांनी यापुढील अधिक सक्रीय काम करून पक्षसंघटना वाढीसाठी प्रयत्न करावे असे आवाहन काकडे यांनी केले.

जिल्हा प्रभारी माजी आमदार अशोक बापू पवार म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षांमध्ये तरुण पिढीला काम करण्याची अधिक संधी आहे. मात्र राजकारणापासून लोक लांब जात आहेत. आगामी काळात जिल्ह्यातील सर्व तालुकानिहाय बैठका आयोजित करून तरुणांना पक्षासोबत जोडण्याचे आपण काम करून पक्ष बांधणी मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. संपूर्ण जिल्ह्याचा दौरा करून आढावा बैठक घेऊन पक्षाची ताकद वाढवणार व पक्षामध्ये आपापसातील मतभेद आहे ते संपून एक मताने व एक विचाराने सर्व जाती-धर्माच्या लोकाना पक्षासोबत जोडण्याचे काम करणार असल्याची भावना व्यक्त केली.

# शौनक भालेकर याचे हार्मोनियम व गायन परीक्षेत प्राविण्य

**● पारनेर । वीरभूमी–**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई आयोजित हार्मोनियम व गायनाच्या प्रारंभिक परीक्षेत राळेगणसिद्धी येथील शौनक भालेकर याने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन प्राविण्य मिळविले.

त्याच्या या यशाबद्दल अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब सूर्यवंशी यांच्या हस्ते त्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य ज्ञानेश्वर गाडगे, संचालक अभय टिळक, राजू महाराज ढोरे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी संगिता बांगर यांच्यासह संतपीठातील शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शौनकला सध्या संगीत शिक्षणाचे धडे संगीत विशारद विलास महाराज कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळत आहेत.

त्याच्या यशाबद्दल ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अण्णासाहेब हजारे, सरपंच जयसिंग मापारी, मा. जि. प. सदस्य दत्तात्रय गाडेकर, माजी सरपंच डॉ. धनंजय पोटे, लाभेष औटी, उद्योजक सुरेश पठारे, आदर्श ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन दादा पठारे आणि भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयातील सहसंचालक डॉ. गणेश पोटे, सामाजिक कार्यकर्ते सुनिल हजारे, शरद मापारी, प्रदिप पठारे, पंकज तिकोणे, हनुमंत पठारे, नवनाथ गाजरे पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी शौनकचे अभिनंदन केले.

# शिक्षक व पालकांचे योगदान विद्यार्थ्यांना नव्या आव्हानांबरोबर लढण्याचे सामर्थ्य देते

## अभय आव्हाड । विवेकानंद विद्यामंदिरमध्ये पार्थ समर कॅम्पचे आयोजन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

आगामी काळात शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी करताना संस्था पातळीवर सुद्धा अभ्यासक्रमा व्यतिरिक्त विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास व सकारात्मक क्रियाशीलता वाढविणारे करावे लागेल. शिक्षक व पालकांचे संयुक्त योगदान विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये नव्या आव्हानांबरोबर लढण्याचे सामर्थ्य देऊ शकतात, असे मत पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी व्यक्त केले.

अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान व विवेकानंद विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने पार्थ समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शहरातील शंभर विद्यार्थ्यांनी भाग घेतला. इंग्रजी शब्दांचे खेळ, गणिताची जादू, विज्ञान प्रयोग, सामान्य ज्ञान, क्रिकेट, बुद्धिबळ, मिनी गोल्फ, तिरंदाजी, स्केटिंग, थलेटिक्स, टेबल टेनिस, एरोबिक्स, रंग भरण, गायन अशा विविध प्रकारांचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. याबरोबरच आहार व योग प्राणायाम याबाबतही मुलांना तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. सांगता समारोपाला विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त दिलीप गर्जे, साहित्य मंडळाचे अध्यक्ष अविनाश मंत्री, ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक प्रा. विजय देशमुख, विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद मेढे, विद्यामंदिरच्या मुख्याध्यापक अनुजा कुलकर्णी, पर्यवेक्षक ज्ञानेश्वर गायके आदी व्यासपीठावर उपस्थित होते. विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभही मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

यावेळी बोलताना आव्हाड म्हणाले, नव्या पिढी पुढे समाज माध्यमांसह मोबाईल संस्कृतीचे आक्रमण होत आहे. समाज माध्यमांची जवळीक वाढत चालल्याने माहितीचा विस्फोट होऊन विद्यार्थ्यांमध्ये अकाली प्रौढत्वाचा धोका वाढला आहे. विद्यार्थ्यांना विचार करायला सुद्धा वेळ मिळेल असे वातावरण आता कमी होत जाऊन सर्वच क्षेत्रातील तीव्र स्पर्धेचा तणाव एका बाजूने तर पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा दबाव दुसऱ्या बाजूने वाढत असल्याने विद्यार्थी एकलकोंडा व अबोल होत आहे. त्याला त्याचे भाव विश्व व्यक्त करायला एखादा कोपरा सुद्धा घरात आणि वर्गात नाही. ही उणीव भरून काढायची असेल तर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमा व्यतिरिक्त उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. नैसर्गिक पद्धतीने जगू द्या, मित्रांबरोबर खेळू द्या, मैदानावर पळू द्या, घरामध्ये दंगामस्ती करू द्या, अशी विद्यार्थ्यांची आर्त हाक आता पालकांनी दुर्लक्षित करून चालणार नाही. समर कॅम्पच्या माध्यमातून शहरातील इच्छुक विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जाऊन कॅम्पचे प्रशिक्षक विद्यार्थ्यांबरोबर संपर्कात राहून संवाद वाढवतील आगामी शैक्षणिक वर्षातही अशा पद्धतीतून विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांनी संपर्क वाढवावा असे नियोजन केले जाईल असे आव्हाड म्हणाले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनुजा कुलकर्णी सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके तर आभार संपत घारे यांनी मानले. कुणाल आव्हाड, दीपक राठोड, रावसाहेब मोरकर, ऋषिकेश मुळे आदींनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com